# अर्थ प्रशासन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जाकृ./अप्रवि/अंसेनियो/1023/२०१७ दिनांक: 12/१०/२०१७

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. जाकं./अप्रवि/अंसेनियो/290/2017 दि. 12/06/2017 नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील राजीनामा दिलेले, मृत्यु झालेले, अधिकारी/कर्मचारी यांची माहिती कृषि व पदुम शासन निर्णय कमांकः संकिर्ण–1514/प्र.क.117/6–अे दिनांकः 30/11/2015 नुसार मागितलेल्या आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये (नमुना अ,ब,क,ड) रितसर माहिती भरून या कार्यालयात सादर करण्याविषयी सुचित केले होते.

परंतु अद्याप देखील जवळपास सर्व विभागांकडून विहीत नमुन्यातील प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेले नाहीत. तसेच चालु वित्तीय वर्षात नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील सेवानिवृत्त होणा–या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती देखील या कार्यालयास अप्राप्त आहे. करीता पुनश्चः सर्व आहरण व संवितरण अधिका–यांना सुचित करण्यात येते की, संबंधित बाबतचे प्रस्ताव विहीत नमुन्यात या कार्यालयास दि. 18/10/2017 पर्यंत सादर करण्यात यावे. अन्यथा, संबंधित बाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

या कार्यालयाच्या असेही निदर्शनास आले आहे की, नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील अधिकारी/कर्मचा–यांच्या संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधितांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची माहिती अजुनही विहित नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर केलेले नाहीत. तसेच नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या प्रलंबित नोंदीसह D.C.P.S. Information Statement ची Hard copy देखील या कार्यालयास अप्राप्त आहेत. संबंधित बाबतचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असते. सदर प्रकरणी झालेल्या विलंबास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

## नमुना-अ

### परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांच्या लेख्यात जमा रक्कमेच्या परताव्यासंबंधी मृत कर्मचाऱ्याच्या वारसाने / सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्याने करावयाचा अर्ज

वारसाचे / कर्मचाऱ्याचे नाव व पूर्ण पत्ता :

दिनांक :

प्रति,

आहरण व संवितरण अधिकारी,

कार्यालयाचे नाव व पत्ता

विषय :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत जमा असलेल्या रकमेच्या परताव्याबाबत.

महोदय,

१) माझे / माझी / माझा पती / पत्नी / भाऊ / बहीण / मुलगा / मुलगी / कै.श्री./ श्रीमती----------- हे / हया सेवेत दिनांक-------ते दिनांक--------कार्यरत होते / होत्या. दिनांक----------रोजी त्यांचे निधन झाले आहे. त्यामुळे त्यांची सेवा दिनांक----------पासून संपुष्टात आली आहे. सेवेत असताना ते / त्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते / होत्या.

त्यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत रक्कम मिळण्यासाठी मला नामनिर्देशित केले आहे / त्यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत रक्कम मिळण्यासाठी मला नामनिर्देशित केले नाही परंतु भविष्य निर्वाह निधी नियम, १९ मधील तरतुदींच्या अनुषंगाने मी त्यांचा वारस ठरतो/ठरते. (लागू नसेल ते खोडावे) त्यामुळे त्यांच्या लेख्यात जमा असलेल्या रकमेचा परतावा मला मिळावा, ही विनंती. यासोबत मी कै.श्री/श्रीमती -------------- यांचा मृत्यूच्या दाखल्याची मूळ प्रत जोडत आहे. त्यांचेशी माझे नाते पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | मयत कर्मचाऱ्याशी नाते |
|---|---|---|
| | | |

२) मी खाली सही करणार श्री/श्रीमती----------------सेवेत दिनांक-----------ते दिनांक-----------कार्यरत होतो / होते. मी सेवेचा राजीनामा दिल्यामुळे / मला बडतर्फ करण्यात आल्यामुळे / माझी सेवा---------------या कारणाने संपल्याने (कारण नमूद करावे) दिनांक--------------पासून संपुष्टात आली आहे. मी सेवेत असताना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना या योजनेचा सभासद होतो. माझी सेवा संपुष्टात आल्यामुळे माझ्या लेख्यात जमा असलेल्या रकमेचा परतावा मला मिळावा, ही विनंती. याबाबत आवश्यक तो तपशिल खालीलप्रमाणे देत आहे. माझ्या वेतनामधून माहे----------२०-----------मध्ये शेवटची वजाती------संस्थेमधून करण्यात आली असून सदर देयकाचा प्रमाणक क्र.--------------दिनांक------------असा आहे.

३) कर्मचाऱ्याचा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे आहे :

| कर्मचाऱ्याचे नाव | लेखा क्रमांक | सेवेत रुजू झाल्याची तारीख | मृत्युच्या वेळी सेवा / समाप्तीच्या वेळी धारण केलेले पद | अर्जदाराचाकर्मचाऱ्याचा / सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| | | | | |

आपला विश्वासु,

सोबत :- मृत्युचा दाखला

स्थळ :-

दिनांक :-

(        )

## नमुना-ब

आहरण व संवितरण अधिकाऱ्याने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत कर्मचाऱ्याच्या लेख्यात जमा रकमेची माहिती कर्मचारी सेवासमाप्तीच्या वेळी ज्या कार्यालयात कार्यरत होता त्या नियंत्रकाकडून प्राप्त करण्याकरीता करावयाचा अर्ज.

कार्यालयाचे नाव व पत्ता
दिनांक

प्रति,

नियंत्रक,
कृषि विद्यापीठे
----------------------
----------------------

विषय :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत जमा असलेल्या रक्कमेच्या परताव्याकरीता लागणारे विवरणपत्र (नमुना-ई-१) पाठविण्याबाबत.

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री. / श्रीमती----------------------यांचे दिनांक----------------रोजी निधन झाल्यामुळे / त्यांनी दिनांक--------------पासून सेवेचा राजीनामा दिल्यामुळे / त्यांनी दिनांक----------------पासून स्वेच्छासेवानिवृत्ती पत्करल्यामुळे / त्यांना सेवेतून दिनांक-------------पासून बडतर्फ करण्यात आल्यामुळे/------------------कारणाने सेवा संपल्याने/--------------------(कारण नमूद करावे) या कारणामुळे त्यांची सेवा दिनांक---------------पासून संपुष्टात आलेली आहे. सदर कर्मचारी सेवेत असताना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणामुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे त्यांच्या लेख्यात जमा असलेल्या रकमेचा परतावा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या वारसदारास / त्यांना परत मिळण्याबाबत वारसदारांचा / त्यांचा अर्ज प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशिल खालील प्रमाणे सादर करीत आहे :

| नांव | लेखा क्रमांक | सेवेत रुजू झाल्याची तारीख | सेवा समाप्तीच्या वेळी धारण केलेले पद | सध्याचा पत्ता | सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून सेवा समाप्तीच्या दिनांकापर्यंतचा तपशिल दर्शवावा आर्थिक ) (वर्षानुरुप | कर्मचाऱ्याने धारण केलेले पद | कार्यालयाचे नाव | संस्थेचे नाव | संबंधित संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे या योजनेखालील वर्षवार जमा रकमा संबंधित आर्थिक वर्षातील अंतिम जमा रक्कम दर्शवावी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

वरील तपशिलाप्रमाणे सदर कर्मचारी आपल्या कार्यकक्षेतील कार्यालयात कार्यतर असल्यामुळे सदर कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेल्या रकमेचे विवरणपत्र कृपया पाठवावे ही विनंती. सदर कर्मचाऱ्याच्या वेतनातून शेवटची वर्गणी माहे----------२०------च्या वेतनामधून करण्यात आली असून सदर देयकाचा प्रमाणक क्रमांक----व दिनांक---------------आहे.

यासोबत कर्मचाऱ्याच्या अर्जाची प्रत / वारसदाराच्या अर्जाची प्रत / मृत्युच्या दाखल्याची प्रत तसेच इतर संबंधित कोषागाराकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्राची (पत्रांच्या) मुळ प्रत / प्रती जोडली (ल्या) आहे.

आपला विश्वासु,

सोबत :- १) वारसदाराचा / कर्मचाऱ्याचा अर्ज.
२) मृत्युचा दाखला.
३) ताळमेळ विवरणपत्र / विवरणपत्रे (मुळ प्रत).

स्वाक्षरी
(आहरण व संवितरण अधिकारी)

## नमुना - क

आहरण व संवितरण अधिकाऱ्याने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत कर्मचाऱ्याच्या लेख्यात जमा रकमेच्या परताव्यासंबंधी करावयाचा अर्ज

कार्यालयाचे नांव व पत्ता

दिनांक -

प्रति,
नियंत्रक, कृषि विद्यापीठे
--------------------------
--------------------------

विषय - परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत जमा असलेल्या रक्कमेच्या परताव्याबाबत----

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री./श्रीमती-------------------यांचे दिनांक---------------रोजी निधन झाल्यामुळे/त्यांनी दिनांक --------------पासून सेवेचा राजीनामा दिल्यामुळे/त्यांनी दिनांक --------------पासून स्वेच्छासेवानिवृत्ती पत्करल्यामुळे/त्यांना सेवेतून दिनांक ----------पासून बडतर्फ करण्यात आल्यामुळे/--------------------------------कारणाने सेवा संपल्याने/---------------------------(कारण नमूद करावे) या कारणामुळे त्यांची सेवा दिनांक ---------------पासून संपुष्टात आलेली आहे. सदर कर्मचारी सेवेत असतांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणांमुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे त्याच्या लेख्यात जमा असलेल्या रकमेचा परतावा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या वारसदारास/त्यांना परत मिळण्याबाबत वारसदाराचा/त्यांचा अर्ज प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशील खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| नांव | लेखा क्रमांक | सेवेत रुजू झाल्याची तारीख | सेवा समाप्तीच्या वेळी धारण केलेले पद | सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून ते सेवा संपुष्टात येईपर्यंतच्या सेवेचा तपशील (आर्थिक वर्षानुरुप) | पद | कर्मचारी कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नांव | कोषागाराचे नांव | संबंधित कोषागाराने प्रमाणित केल्याप्रमाणे या योजनेखालील वर्षवार जमा रकमा (संबंधित आर्थिक वर्षातील अंतिम जमा रक्कम दर्शवावी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

सदर कर्मचाऱ्याच्या वेतनातून शेवटची वर्गणी माहे ------------२००--------च्या वेतनामधून करण्यात आली असून सदर देयकाचा प्रमाणक क्रमांक -------------व दिनांक ----------आहे.

यासोबत कर्मचाऱ्याचा अर्ज/वारसदाराचा अर्ज/मृत्यूचा दाखला, आर्थिक वर्षाच्या नमुना आर-३ मधील लेखा विवरणाची (Statement Of Accounts) प्रत जोडण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

सोबत - १) वारसदाराचा/कर्मचाऱ्याचा अर्ज.
२) मृत्यूचा दाखला.
३) आर्थिक वर्षाच्या नमुना आर-३ मधील लेखा विवरणाची (Statement Of Accounts) प्रत

स्वाक्षरी
(आहरण व संवितरण अधिकारी)

## नमुना - ड

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत कर्मचाऱ्याच्या लेख्यात जमा असलेल्या रक्कमेच्या ताळमेळासंबंधीचे विवरणपत्र

( कर्मचारी शेवटी ज्या कार्यालयात कार्यरत होता त्या कार्यालयाने द्यावयाचे विवरणपत्र)

( ** ज्या वर्षाचे विवरणपत्र असेल त्या पूर्वीच्या वर्षातील अंतिम जमा रक्कम दर्शवावी)

( विवरणपत्र आर्थिक वर्षनिहाय तयार करावे)

| | | |
|---|---|---|
| कर्मचाऱ्याचे नांव | : | |
| लेखा क्रमां | : | |
| कार्यालयाचे नांव | : | |
| सेवा संपुष्टात आल्याचा दिनांक | : | |
| सेवा संपुष्टात आली तेव्हा धारण केलेले पद | : | |
| आर्थिक वर्ष | : | |

| सेवा संपुष्टात आली त्यावेळेचा कर्मचाऱ्याच्या लेख्याचा तपशील | | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| ** कर्मचाऱ्याच्या खाती मागील वित्तीय वर्षाअखेरीस जमा असलेली रक्कम (Opening Balance) | | | | |
| कर्मचाऱ्याच्या लेख्यात चालू वित्तीय वर्षात सेवा संपुष्टात येण्याच्या तारखेपर्यंत जमा झालेली रक्कम | | | | |
| महिना | कर्मचाऱ्याचे अंशदान | शासनाचे अंशदान | व्याज | |
| मार्च | | | | |
| एप्रिल | | | | |
| मे | | | | |
| जून | | | | |
| जुलै | | | | |
| ऑगस्ट | | | | |
| सप्टेंबर | | | | |
| ऑक्टोबर | | | | |
| नोव्हेंबर | | | | |
| डिसेंबर | | | | |
| जानेवारी | | | | |
| फेब्रुवारी | | | | |
| एकूण | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, संबंधित कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक लेख्यात आणि ब्रॉडशिट मध्ये संबंधित वर्षात वर दर्शविल्याप्रमाणे नोंदी घेतलेल्या आहेत. आणि उपरोक्त रकमेचा ताळमेळ कोषागार लेख्याशी घेतला असता उपरोक्त रकमा बरोबर असल्याचे आढळून आले आहे.

( नियंत्रकाची स्वाक्षरी)